MHAH080001452014

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९९/१९९५**
**लक्ष्मण वि. रंगनाथ, वगैरे**

## निशाणी क्र.२५८ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ गोपीनाथ रभाजी वाघ यांचे वारस रेकॉर्ड वर घेण्यासाठी व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दुरूस्ती करण्यासाठी केला आहे.

२.दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वाटप व मनाई हुकूमासाठी केला आहे. प्रतिवादी क्र.२ गोपीनाथ रभाजी वाघ हा दिनांक ०५.०५.२०२१ रोजी मयत झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याने सदर अर्जा मध्ये नमुद केलेल्या वारसाचा दाव्यात हक्क निर्माण झाला असुन त्याला सदरहु अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे वारस आहेत. वादींनी जाणुनबुजुन उशिर केलेला नाही. सबब प्रस्तावित अर्जात नमुद केलेले प्रतिवादी क्र.२ चे वारसांना रेकॉर्डवर घेण्याची व दाव्यात तशी दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी म्हणणे देवुन आक्षेप नोंदवला. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक नाही. अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादी व प्रतिवादी हे एकाच कुंटूबातील असुन त्यांनी जाणुनबुजूत उशीर केला आहे. वैकल्पीकरित्या अर्ज मंजुर करावा असे कोर्टाचे मत झाल्यास जास्तीत जास्त कॉस्टचा हुकूम व्हावा. वादीचे अर्जास बारा महिन्यापेक्षा जास्त उशीर झाला आहे. सबब वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा दावा मिळकतीची वाटपा होवुन मिळणेकामी व मनाई हुकूमासाठी केला आहे. अर्जाचे स्वरूप पाहता वादीने प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी नं.२ चे वारस म्हणुन दाव्याकामी सामील करण्यासाठी दिलेला आहे. सदयस्थितीत त्याचा कोणताही तोटा प्रतिवादींना

संभवत नाही. किंबहुना प्रतिवादी क्र.२ चे वारस दाव्याकामी घेणे हे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक बाब आहे. अन्यथा दाव्यातील गुंतागुंत वाढु शकेल. अशा परिस्थितीत दाव्यात प्रस्तावित दुरुस्ती करावयाची परवानगी दिली तर दाव्याच्या मागणीत किंवा मुळ स्वरुपात बदल होणार नाही. माझे मते, वादीने मागणी केल्याप्रमाणे दुरूस्ती अर्ज मान्य केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजुर केल्यास दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यास त्याची बाधा निर्माण होईल. तसेच त्यामुळे प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे :-

**आदेश**

१. सदरहु अर्ज निशाणी क्र. २५८ हा निशाणी क्र.२५४ व निशाणी २५६ वरील आदेशाची पुर्तता करण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादीने रक्कम रूपये ५००/- (अक्षरी रूपये दोनशे मात्र) आज किंवा पुढील तारेखपर्यंत तालुका विधी सेवा प्राधिकरण, संगमनेर येथे जमा करण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्जात उल्लेखीत केलेनुसार मयत प्रतिवादी क्र.२ गोपीनाथ रभाजी वाघ यांचे वारस दाव्यामध्ये दुरूस्ती करून सामील करावेत तसेच दुरूस्त दाव्याची प्रत या आदेशापासुन १४ दिवसांचे प्रतिवादी यांस पुरवावी.

Mohinee Janu Gaikwad
Digitally signed by Mohinee Janu Gaikwad
Date: 2023.08.02 10:38:40 +0000

(एम.जे.गायकवाड)
५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
संगमनेर

दिनांक ०२.०८.२०२३